MHRG040058022025

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७७०/२०२५**</u>

श्रीमती. मेरी पी. चेरीयन वि. निरंक

<u>**निशाणी क्र. १ वरील आदेश**</u>

१. सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन १८२७ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे **मयत जॉन अलेक्झंडर** हे दिनांक २०.०६.२०१९ रोजी हॅकन्सॅक सिटी, बर्गन, न्यु जर्सी येथे मृत्युपत्र न करता मरण पावले आहेत. अर्जदार ही **मयत जॉन अलेक्झंडर** यांची पत्नी आहे. अर्जदार ही **मयत जॉन अलेक्झंडर** यांची वारस आहे. **मयत जॉन अलेक्झंडर** यांच्या आई मेरी वेलाईल हया दिनांक २२.०१.२००१ रोजी न्युयॉर्क येथे मयत झालेल्या आहेत तसेच मयत **जॉन अलेक्झंडर** यांचे वडील जॉन डनाईल हे दिनांक २१.०६.१९९८ रोजी मुंबई येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हिने वारसदाखला मिळण्याकामी या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही. करीता सदर अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी नि.क्र. १० वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. तसेच कागदपत्र म्हणुन **मयत जॉन अलेक्झंडर** यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१३, मयत मेरी वेलाईल यांचा मृत्युदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१४, मयत जॉन डनाईल यांचा मृत्युदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१५, अर्जदाराचे आधार कार्डची प्रमाणित प्रत नि.क्र.१६, दिनांक ०३.०४.२००७ रोजीचे पवल१–०२७२७–२००७ करारनाम्याची प्रमाणित प्रत नि.क्र.१७, दिनांक १९.०६.२००९ रोजीचे वदर१५–०५४२५–२००९ रोजीचे घोषणाप्रत्राची प्रमाणित प्रत नि.क्र. १८, पुरावा बंद पुरशीस नि.क्र. २० वर दाखल केले आहे.

४. अर्जासंदर्भात नि.क्र. ७ व ८ प्रमाणे जाहीरनामा व नि.क्र. १९ वरील 'दैनिक ग्लोबल टाईम्स' वर्तमानपत्रातील दिनांक १०.०१.२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मात्र कोणत्याही ति—हाईत इसमाची याकामी हरकत प्राप्त झाली नाही.

५. दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता **मयत जॉन अलेक्झंडर** हे दिनांक २०.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार ही **मयत जॉन अलेक्झंडर** यांची पत्नी आहे. करिता अर्जदार ही **मयत जॉन अलेक्झंडर** यांची कायदेशीर वारस आहे. नि.क्र. ७ व ८ वरील जाहीरनामा व नि.क्र. १९ वरील जाहीर नोटीस प्रसिध्द होउन देखील इतर कोणत्याही ति—हाईत इसमांनी याकामी हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार ही **मयत जॉन अलेक्झंडर** यांची कायदेशीर वारस आहे असा दाखला आवश्यक त्या मुद्रांकशुल्क यावर देणेत यावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR

Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.03.13 12:56:56 +0530

पनवेल

**दि.१२.०३.२०२६**

(राजश्री म. गणवीर)

**३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल**